सुविचार

संकटांतच खरे आपले कोण हे लवकर समजते

॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

अहिल्यानगर | बुधवार, दि. २७ मे २०२६ | वर्ष ७ वे | अंक ४ था | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145


## SPOT NEWS

### युद्धविरामादरम्यान अमेरिकेचा इराणवर हल्ला

**तेहरान** – अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या शस्त्रसंधी वाटाघाटीदरम्यान, अमेरिकेच्या सैन्याने होर्मुज सामुद्रधुनीजवळ इराणी क्षेपणास्त्र प्रक्षेपण स्थळे आणि सुरुंग पेरणाऱ्या बोटींना लक्ष्य केले. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनुसार, ही कारवाई सेल्फ-डिफेन्स म्हणजेच आत्मसंरक्षणासाठी करण्यात आली. सेंटकॉमचे प्रवक्ते टिमोथी हॉकिन्स म्हणाले की, अमेरिकन सैनिक आणि युद्धनौकांना धोक्यापासून वाचवण्यासाठी हे हल्ले करण्यात आले. तथापि, त्यांनी असेही सांगितले की, शस्त्रसंधीदरम्यान अमेरिका संयम बाळगत आहे. होर्मुज सामुद्रधुनी जगातील सर्वात महत्त्वाच्या सागरी व्यापार मार्गांपैकी एक मानली जाते. याच मार्गातून मोठ्या प्रमाणात तेलाचा पुरवठा होतो. अमेरिकेच्या सैन्याचा आरोप आहे की, इराणी बोटी सागरी मार्गात सुरुंग पेरण्याचा प्रयत्न करत होत्या, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय जहाजे आणि अमेरिकन युद्धनौकांना धोका निर्माण होऊ शकला असता. यापूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला होता की, इराणचे युरेनियम एकतर अमेरिकेला सुपूर्द केले जाईल किंवा आंतरराष्ट्रीय देखरेखीखाली नष्ट केले जाईल.

### सागरी मार्गांचे स्वातंत्र्य आवश्यक

**नवी दिल्ली** – आज नवी दिल्लीत क्वाड देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांनी बैठक घेतली. बैठकीनंतर ऑस्ट्रेलियाच्या परराष्ट्रमंत्री पेनी वोंग यांनी होर्मुजचा मुद्दा उपस्थित करत म्हटले की इराणकडून होर्मुजची सामुद्रधुनी बंद केल्याचा परिणाम ऊर्जा सुरक्षेवर स्पष्टपणे दिसत आहे. समुद्री मार्गांचे स्वातंत्र्य राखणे आवश्यक आहे आणि क्वाड देश कोणत्याही प्रकारचा टोल लावण्यास विरोध करतो. त्याचबरोबर त्यांनी सांगितले की, सदस्य देश केवळ चर्चेवर नव्हे, तर ठोस निष्कर्षांवर लक्ष केंद्रित करत आहेत. त्यांनी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांच्या राजनैतिक प्रयत्नांचेही कौतुक केले. तर, पत्रकार परिषदेत परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी दहशतवादाच्या मुद्यावर बोलताना सांगितले की, याविरोधात शून्य सहनशीलता असावी. ज्या देशांवर दहशतवादी हल्ले होतात, त्यांना स्वत:च्या संरक्षणाचा अधिकार आहे.

# मोदींच्या तपपूर्तीच्या मुहुर्तावरच महागाईचा भडका!

## मालवाहतूक महागल्यामुळे दूध, तेल, भाज्या, डाळींसह जीवनावश्यक वस्तू कडाडल्या

**नवी दिल्ली | वीरभूमी** –

देशात आज मोदी सरकारच्या सत्तेची तपपूर्ती साजरी होत असताना आर्थिक महासंकट, महागाईचा अभूतपूर्व भडका यामुळे चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. अमेरिका-इराण युद्धामुळे कच्च्या तेलाचे दर वाढले आणि रुपयाचीही मोठी घसरण झाली. यातून देशावरच आर्थिक संकट ओढवले असून, यातून केंद्र सरकारने पेट्रोल, डिझेल, सीएनजीच्या दरवाढीचा धडाका सुरू केला. दोन आठवड्यांपेक्षा कमी काळात सलग चौथ्यांदा पेट्रोल, डिझेल, सीएनजीचा दर वाढविला. केंद्र सरकारने अत्यंत निर्दयीपणे दरवाढीचा धडाका सुरू ठेवल्याने माल वाहतूक, प्रवास खर्च वाढला आणि जवळपास सर्वच वस्तूंचे दर वाढले आहेत. त्यामुळे महागाईचा आगडोंब उसळला असून, संपूर्ण देश महागाईच्या खाईत होरपळत आहे. यामुळे देशात असंतोष वाढला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २६ मे २०२६ रोजी आपल्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीची १२ वर्षे पूर्ण केली. त्यामुळे देशात मोदी सरकारची तपपूर्ती साजरी केली जात आहे. महाराष्ट्रातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती या विशेष संग्रा अंकाचे प्रकाशन झाले. मुंबईतील प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिर येथे हा सोहळा पार पडला. देशात मोदींच्या सत्तेची तपपूर्ती उत्साहात साजरी होत असताना नेमक्या याचवेळी देशात महागाईचा आगडोंब उसळला. पेट्रोल, डिझेल, सीएनजीसह सर्वच वस्तूंचे दर सातत्याने वाढविले जात असून, यामुळे अभूतपूर्व स्थिती निर्माण झाली आहे. यातून जनतेमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.



वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतींमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी केंद्र सरकारने इंधनाच्या किमती वाढवल्या. १५ मे रोजी पेट्रोल, डिझेलच्या दरात प्रथम प्रतिलिटर ३ रुपयांनी दरवाढ केली. त्यानंतर १९ मे रोजी ९४ ते ९७ पैशांची वाढ केली. त्यानंतर लगेचच शनिवारी तिसरी दरवाढ केली. त्यानंतर सोमवारीही त्यापेक्षा दोन पावले पुढे टाकत पेट्रोल, डिझेलच्या दरात तब्बल पावणेतीन रुपये वाढविले. वाढत्या इंधन दरांचा परिणाम केवळ तुमच्या दैनंदिन प्रवासावरच नाही तर इतर सेवांवर आणि वस्तू खरेदीवर झाला. त्यामुळे .या दरवाढीची मोठी किंमत मोजावी लागत आहे.

अर्थात, पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीमुळे फूड डिलिव्हरी आणि किराणा मालापासून ते बाहेर जेवण्यापर्यंतचा दैनंदिन खर्च वाढला आहे. यासोबतच जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीचा खर्चही वाढला असल्याने ग्राहकांच्या घरगुती बजेटवर परिणाम झाला आहे. इंधनाच्या किमतींचा परिणाम वाहतूक आणि पुरवठा साखळीवर झाला आहे. त्यामुळे मुख्य धान्य, पॅकेज केलेले खाद्यपदार्थ आणि इतर जीवनावश्यक वस्तूंसह दैनंदिन गरजेच्या वस्तू महाग होऊ लागल्या आहेत. यासोबतच भाजीपाला कडाडला, खाद्यतेल तडकले आणि किराणा मालाचे दर वाढले आहे. त्यामुळे रोजचे जगणे आता महाग झाले आहे.

एकीकडे पेट्रोल, डिझेलच्या दरवाढीचा धडाका सुरू असताना आज सीएनजीच्या दरात वाढ केली. सीएनजीच्या दरातही १२ दिवसांत ४ वेळा वाढ झाली. त्यानुसार १२ दिवसांत सीएनजी ६ रूपयांनी वाढला. १५ मे रोजी सीएनजीच्या दरात २ रूपये वाढविले. १७ मे रोजी पुन्हा १ रूपये आणि २३ मे रोजी १ रुपयाने सीएनजी वाढला. त्यानंतर आज २६ मे रोजी चौथ्यांदा २ रुपयांनी सीएनजी वाढला.

पेट्रोल, डिझेलनंतर सीएनजी किलोमागे ३ ते ४ रुपयांनी महागला. त्यामुळे मालवाहतुकीचे दरही वाढले आणि वाहतूक खर्च वाढल्याने वस्तूंचे दरही वाढविण्यात आले. सोबतच अमूल, मदर डेअरी आणि गोकुळ दूध लिटरमागे दोन रुपयांनी वाढले. पॅकबंद तांदुळ गुणवत्तेनुसार ४२ ते १५० रुपये किलोने घ्यावा लागत आहे. तसेच रोज लागणा-या भाज्या प्रचंड महागल्या आहेत.

सूर्यफूल, सोयाबीन आणि पामतेलाचे दर १० ते १५ रुपयांनी लिटरमागे वाढले आहेत. जे ब्रॅण्ड १४० ते १४५ रुपये लिटरने मिळत. ते किरकोळ बाजारात आता १६७ ते १८७ रुपये लिटरने घ्यावे लागत आहेत. १५ किलोंचा कॅन जो २००० ते २५०० रुपयांना मिळत असे, त्यासाठी ३००० ते ३५०० रुपये मोजावे लागत आहेत. चांगल्या कंपनीची तूरडाळ किरकोळ बाजारात १०० ते १३० रुपये किलोवर पोहोचली आहे.

## शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना मुख्यमंत्र्यांनी दिली मुदतवाढ

**मुंबई | वीरभूमी** –

राज्य मंत्रिमंडळाची एक अत्यंत महत्त्वाची बैठक आज मुंबईत पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या हिताचा आणि कोकणवासीयांच्या जिव्हाळ्याचा निर्णय घेण्यात आला. आगामी जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या या वर्षातील सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ देण्यास मंत्रिमंडळाने अधिकृत मान्यता दिली आहे.

या निर्णयानुसार आता राज्य शासनाला ३० जून २०२६ पर्यंत शासकीय कर्मचाऱ्यांची बदली प्रक्रिया राबविता येणार आहे. यासाठी मूळ बदली अधिनियमात कायदेशीर सुधारणा करण्याचा मसुदाही मंजूर करण्यात आला आहे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या दरवर्षी एप्रिल आणि मे महिन्यात केल्या जातात. मात्र, सध्या देशात जनगणना २०२७ अंतर्गत पहिला टप्पा सुरू होत आहे. यामध्ये घरयादी तयार करणे व घरगणना करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम केले जाणार आहे.

जनगणनेच्या या राष्ट्रीय कामासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या या काळात करण्यात येऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. त्यामुळेच राज्य सरकारने बदल्यांची मुदत ३० जून २०२६ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या मुदतवाढीसाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे नियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मध्ये आवश्यक ती सुधारणा केली जाणार आहे.

## तटकरे, भुजबळांध्ये बैठकीत खडाजंगी

**मुंबई | वीरभूमी** –

अजितदादांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेत्यांची पक्षातील नाराजी वाढत चालली आहे. पक्षाच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार या माय-लेकांनी घेतलेल्या काही निर्णयांनी पक्षातील वरिष्ठ नेते नाराज असल्याची माहिती पुढे येत असताना आज राष्ट्रवादी पक्षाच्या महत्वाच्या बैठकीला वरिष्ठ नेते प्रफुल्ल पटेल गैरहजर राहिले. यावेळी तटकरे यांनी आमच्यावर टीका होत असताना पक्षातील कोणतेही नेते आमच्या मदतीला आले नाहीत, अशा शब्दांत मनातील खदखद बोलून दाखविली. त्यावेळी तटकरे, भुजबळ यांच्यात खडाजंगी झाल्याचे वृत्त आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या आजी, माजी आमदारांची महत्वाची बैठक पक्षाध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली देवगिरी बंगल्यावर आज आयोजित करण्यात आली होती. पक्षाचे विधानसभेचे आणि विधान परिषदेचे आमदार या बैठकीला हजर होते. मात्र, मुंबईत असूनही प्रफुल्ल पटेल बैठकीला गैरहजर राहिले. यावेळी तटकरे यांनी आपल्यावर आणि प्रफुल्ल पटेल या ज्येष्ठ नेत्यांवर आणि पक्षावर टीका होत असताना पक्षातील इतर कोणताही नेता किंवा नेतृत्व आमचे समर्थन करत नसल्याची खंत व्यक्त केली.

प्रफुल्ल पटेल पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आहेत. पण ते गैरहजर राहिले. त्यातच ज्येष्ठ नेत्यांना डावलेले जात असल्याची पक्षातील दुस-या फळीतील नेत्यांची भावना आहे. या घडामोडीमुळे शरद पवार यांना भेटण्यासाठी काही आमदार आणि तटकरे गेल्याने पक्षात गोंधळाची स्थिती आहे.

दादांच्या निधनानंतर आम्ही पक्ष वाढवत असताना आम्ही दोघेच टिकेचे धनी का, असा सवाल तटकरे यांनी केला. या मुद्यावर छगन भुजबळांनी आक्षेप घेतला. जे झाले ते झाले, ते सोडून द्या, आता पुढे जाऊया, असा सल्ला दिला. त्यावरून दोघांत खडाजंगी झाल्याचे समजते. याचवेळी तटकरे यांचे भाषण सुरू होण्यापूर्वीच पार्थ पवार बैठकीतून निघून गेल्याचे समजते.

# लिंग गुणोत्तर संतुलित राखण्यासाठी अधिक दक्षतेने काम करा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया | आरोग्य विभागाच्या कामकाजाचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

**अहिल्यानगर | वीरभूमी** –

जिल्ह्यातील मुला-मुलींचे लिंग गुणोत्तर संतुलित राखण्यासाठी आरोग्य यंत्रणेने अधिक दक्षतेने काम करावे. अनधिकृत सोनोग्राफी केंद्रांवर अचानक धाडी टाकून दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच टीबी मुक्त भारत अभियान आणि पल्स पोलिओ अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करून आरोग्यविषयक शासकीय उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी जबाबदारीने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आरोग्य विभागाच्या कामकाजाच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, अशासकीय सदस्य डॉ. सुधा कांकरिया यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. तसेच सर्व तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीस सहभागी झाले होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, जिल्ह्यातील ज्या गावांमध्ये लिंग गुणोत्तराचे प्रमाण कमी आहे, त्या गावांमध्ये विशेष जनजागृती बैठका आयोजित कराव्यात. मुलगा-मुलगी समानतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात यावी. तसेच गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करून अनधिकृत सोनोग्राफी केंद्रांविरुद्ध माहिती संकलित करावी आणि अचानक तपासणी मोहिमा राबवून दोषींवर कठोर कारवाई करावी.

क्षयरोग निर्मूलनाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील संशयित क्षयरुग्णांचे लवकर निदान आणि योग्य उपचार होणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक तालुक्यात टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत समाधानकारक प्रगती होणे अपेक्षित असून कामकाजात निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आवश्यक ती कारवाई करण्यात यावी. तसेच क्षयरोग निर्मूलनासाठी आरोग्य यंत्रणेने समन्वयाने आणि परिणामकारक पद्धतीने कार्य करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.



जिल्ह्यात २८ जून रोजी पल्स पोलिओ अभियान राबविण्यात येणार असून या अभियानाची सर्व स्तरांवर व्यापक जनजागृती करण्यात यावी. अभियानासाठी आवश्यक लसींचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवणे, आरोग्य पथके तैनात करणे, दुर्गम भागांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष नियोजन करणे आणि एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही याची काटेकोर नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

एचपीव्ही लसीकरण ही मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची प्रतिबंधात्मक मोहीम असून गर्भाशयाच्यामुखाच्याकर्करोगासारख्या गंभीर आजारापासून संरक्षण मिळवून देण्यासाठी शासनामार्फत ही मोहीम राबविण्यात येत आहे. १४ वर्षे पूर्ण झालेल्या व १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींना या लसीकरणाचा लाभ दिला जात असून पालकांनी कोणतेही गैरसमज न बाळगता आपल्या मुलींना ही लस देऊन त्यांचे आरोग्य सुरक्षित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

SPOT NEWS

## ३० जूनपर्यंत एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्यावी

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**
केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील तरतुदीनुसार १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविणे बंधनकारक असून वाहनधारकांनी ३० जून २०२६ पर्यंत एचएसआरपी बसवून घ्यावी, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी सिद्धार्थ ठोके यांनी केले आहे. केंद्रीय मोटार वाहन नियमांनुसार १ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत झालेल्या वाहनांनाही एचएसआरपी बसविण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत. जुन्या वाहनांवर एचएसआरपी बसविण्याचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असल्याने परिवहन आयुक्तांनी यापूर्वी मुदतवाढ दिली होती. त्यानंतर आता १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांवर एचएसआरपी बसविण्यासाठी ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. १ जुलै २०२६ पासून एचएसआरपी न बसविलेल्या सर्व वाहनांवर (जुनी व नवी) मोटार वाहन कायद्यानुसार वायूवेग पथकाद्वारे कारवाई करण्यात येणार असून वाहनधारकांनी अंतिम मुदतीची प्रतीक्षा न करता तातडीने एचएसआरपी बसवून घ्यावी, असे आवाहनही श्री. ठोके यांनी केले आहे. एचएसआरपीसाठी अर्ज करताना महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाच्या transport.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा. वाहनांची ओळख, सुरक्षितता आणि बनावट क्रमांक प्लेटला आळा घालण्यासाठी एचएसआरपी प्रणाली महत्त्वाची असल्याचेही कळविण्यात आले आहे.

## दत्तात्रय आभाळे यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्काराने गौरव

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**
येथील शालेय शिक्षक दत्तात्रय पांडुरंग आभाळे यांना ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थेच्या वतीने 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. नाशिक येथील वावरेनगर, कामटवाडे येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते आभाळे यांना पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमास रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी, नाशिक महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त नानासाहेब साळवे, राज्य प्रवक्ते डॉ. अविनाश शिंदे, नाशिक जिल्हा पुरवठा अधिकारी रमेश गायकवाड, माजी स्थायी समिती सभापती संजय साबळे, सुधीर उमराळकर, संजय दोफ्लदे, रील स्टार आसावरी बर्वे तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठवले, सचिव मिलिंद कळवणकर आदी मान्यवर उपस्थित होते. संगमनेर तालुक्यातील नांदूर खंदरमाळ येथील भगवती माता विद्यालयात कार्यरत असलेले दत्तात्रय आभाळे यांनी आपल्या कार्यातून शिक्षण आणि समाजसेवेचा अनोखा संगम घडवून आणला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. आज शिक्षक म्हणून कार्यरत असताना ते विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव, नैतिक मूल्ये आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

# पारनेर-जामगाव रस्त्यावर गतिरोधकांची मागणी

**राहुलनगर परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर । अपघात टाळण्यासाठी तातडीने उपाययोजनांची अपेक्षा**

● **पारनेर । वीरभूमी –**
पारनेर ते जामगाव या प्रमुख जोडरस्त्यावर वाहनांची वाढती वर्दळ आणि बेफाम वेगामुळे हा मार्ग अपघातप्रवण ठरत असून, राहुलनगर परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या ठिकाणी तातडीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसवावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून जोर धरत आहे.



पारनेर-जामगाव रस्ता हा परिसरातील अनेक गावांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्यावरून दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू असते. रस्त्याची अवस्था महामार्गासारखी झाल्याने अनेक वाहनचालक भरधाव वेगाने वाहने चालवत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनांचा वेग अधिक धोकादायक ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.


या रस्त्यालगत राहुलनगर ही मोठी निवासी वस्ती असून, येथील लहान मुले, शाळा-कॉलेजला जाणारे विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांना रोजच्या कामासाठी हा रस्ता ओलांडावा लागतो. मात्र, वाहनांचा वेग इतका जास्त असतो की रस्ता ओलांडणे जीवघेणे बनले आहे. वस्ती परिसर असूनही वाहनचालक वेग कमी करत नसल्याने किरकोळ अपघातांचे प्रमाण वाढले असून, भविष्यात मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने या ठिकाणी पांढरे पट्टे मारून दर्जेदार गतिरोधक बसवावेत, अशी मागणी केली आहे.

### अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल

■ आमची लहान मुले खेळताना किंवा शाळेत जाताना रस्त्यावर आली की आमचा जीव टांगणीला लागतो. वृद्ध नागरिकांना रस्ता ओलांडणे कठीण झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने या संवेदनशील भागात गतिरोधक बसवावेत; अन्यथा आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, अशी संतप्त प्रतिक्रिया राहुलनगर परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली.

## निळवंडेच्या पाण्याने पाझर तलाव भरल्याबद्दल आ. विवेक कोल्हे यांचे ग्रामस्थांकडून आभार



● **कोपरगाव । वीरभूमी–**
तालुक्यातील रांजणगाव,वेस सोयगाव, अंजनापूर, बहदराबाद, बहादरपूर, मनेगाव, डांगेवाडी तसेच पंचक्रोशीतील विविध गावांमधील पाझर तलाव निळवंडे धरणाच्या पाण्याने पूर्ण क्षमतेने भरून देण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या महत्त्वपूर्ण कार्याबद्दल परिसरातील नागरिकांनी आमदार विवेक कोल्हे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन ग्रामस्थांनी आमदार विवेक कोल्हे यांच्याकडे पाझर तलाव भरून देण्याची मागणी केली होती. नागरिकांच्या मागणीची तात्काळ दखल घेत आमदार कोल्हे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून प्रश्न मार्गी लावण्यासाठी ठोस पाठपुरावा केला. त्यांच्या सूचनेनुसार प्रशासनाने त्वरित कार्यवाही करत परिसरातील साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरून दिले.

या निर्णयामुळे परिसरातील भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होणार असून विहिरींना पाणी उपलब्ध राहणार आहे. तसेच शेतकरी व नागरिकांसह जनावरांच्या पाण्याचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात सुटणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

ग्रामस्थांनी सांगितले की, आमदार विवेक कोल्हे यांनी नेहमीप्रमाणे जनतेच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने लक्ष देत तातडीने सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे उन्हाळ्यातील संभाव्य पाणीटंचाई टळण्यास मोठी मदत झाली आहे.

# निघोज येथे २८ मेपासून श्रीमद् भागवत महापुराण कथेचे आयोजन

● **निघोज । वीरभूमी–**
निघोज येथील कपिलेश्वर मंगल कार्यालयात गुरुवार दि. २८ मे ते बुधवार दि. ३ जून दरम्यान दररोज सायंकाळी ६ ते ९ या वेळेत श्रीमद् भागवत महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. भागवताचार्य बाबा महाराज खामकर यांच्या सुश्राव्य वाणीतून ही कथा भाविकांना ऐकावयास मिळणार आहे.

गुरुवार दि. २८ रोजी ग्रंथपूजन व दीपप्रज्वलनाने कथेचा शुभारंभ होणार असून, खासदार नीलेश लंके, आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार पोपटराव गावडे, संत निळोबाराय दिंडी सोहळ्याचे आयोजक तथा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अशोकराव सावंत, भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख डॉ. भास्करराव शिरोळे, तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकज कारखिले तसेच निघोजच्या सरपंच चित्राताई वराळ पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे.

कार्यक्रमादरम्यान दररोज पहाटे काकड आरती, महायज्ञ, होमहवन, 'ॐ नमः शिवाय' मंत्रजप, बेलपुष्प अभिषेक, हरिपाठ, भागवत कथा, मातृ-पितृ पूजन, सत्कार समारंभ तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, दि. ३१ मे ते ३ जून या कालावधीत यज्ञ विधी पार पडणार असून पितृदोष व दोषनाशक यज्ञ विधीसाठी प्रथम दिवसापासून उपस्थित राहणे आवश्यक असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या कथामालिकेत श्रीमद् भागवत रहस्य, शुकदेव जन्म, गोकर्ण आख्यान, परीक्षित जन्म, विदुरनीती, भगवान दत्तात्रेय जन्म, शिवसती आख्यान, ध्रुवबाळ कथा, जडभरत कथा, अजामेळ उद्धार, भक्त प्रल्हाद कथा, गजेंद्र मोक्ष, समुद्रमंथन, वामन अवतार, राजा अंबरीश चरित्र, श्रीराम जन्म, सीता स्वयंवर, रावणवध, वसुदेव-देवकी विवाह, श्रीकृष्ण जन्म, कृष्णलीला, दहीहंडी, गोपाळकाला, रुक्मिणी स्वयंवर, सुदामा चरित्र, सुभद्रा हरण आणि तक्षक-कश्यप आख्यान अशा विविध धार्मिक विषयांचे रसाळ निरूपण करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास मृदुंगाचार्य व तबलावादक कुमार अरुण भालेकर, एकनाथ महाराज काळे, गायनाचार्य राजू महाराज ईघे, रुपेश महाराज नायकोडी आदींची संगीत साथ लाभणार आहे.

भागवताचार्य बाबा महाराज खामकर हे अनेक वर्षांपासून कीर्तन-प्रवचनाच्या माध्यमातून लोकप्रबोधन करत असून, अहिल्यानगर, पुणे तसेच राज्यातील विविध भागांत धार्मिक संस्कृतीच्या जतनासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांच्या लोकसहभागातून हा धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. पारनेर व शिरूर तालुक्यातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता असून, त्यादृष्टीने जय्यत तयारी सुरू आहे. या भागवत कथेचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन निघोज ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ तसेच पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील १२ वर्षे 'राष्ट्रनिर्माणाचा सुवर्णकाळ'

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि रविंद्र चव्हाण यांचा गौरव । 'राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती' विशेष संग्राह्य अंकाचे मुंबईत प्रकाशन**

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**
देशाचा स्वाभिमान जागवून परिवर्तन घडवून आणता येते, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १२ वर्षांच्या कार्यकाळातून सिद्ध केले आहे. केवळ अनुदानावर अवलंबून राहणारा नव्हे, तर जगात स्वाभिमानाने उभा असलेला भारत घडविण्याचे कार्य मोदींनी केले, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथे केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी २६ मे २०२६ रोजी पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीची १२ वर्षे पूर्ण करत आहेत. या निमित्ताने 'राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती' या विशेष संग्राह्य अंकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईतील प्रभादेवी येथील रविंद्र नाट्यमंदिरात करण्यात आले. यावेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष अमित साटम, मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय कुटे आणि आमदार सुनील राणे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मोदींनी 'मेक इन इंडिया'सारख्या उपक्रमांद्वारे भारताला 'मेक फॉर वर्ल्ड'च्या दिशेने नेले. पूर्वी जग भारताकडे याचक राष्ट्र म्हणून पाहत होते; मात्र आज भारत जागतिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. मोदींच्या नेतृत्वाखाली देशातील तळागाळातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत शासनाच्या योजना पोहोचल्या. 'हर घर शौचालय', 'उज्ज्वला गॅस योजना' यांसारख्या योजनांमुळे सामान्य नागरिकांच्या जीवनमानात बदल झाला.

ते पुढे म्हणाले की, गरीबकेंद्रित धोरणांमुळे मागील १० वर्षांत २५ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर आले. भारताचा ऋझ्झ २०१३-१४ मध्ये १०३ लाख कोटी रुपये होता, तो २०२५-२६ मध्ये ३५७ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढला. महाराष्ट्राचा ऋझ्झ देखील १३ लाख कोटी रुपयांवरून ५४ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला. मोदींच्या विकासाभिमुख आणि नियोजनबद्ध धोरणांमुळे हा बदल शक्य झाला, असेही त्यांनी नमूद केले.

भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले की, मोदींच्या नेतृत्वाखाली भारताने केवळ आर्थिक प्रगती केली नाही, तर जगासमोर एका नव्या राष्ट्रशक्तीचा आदर्श निर्माण केला आहे. आजचा भारत डिजिटल तंत्रज्ञानाने सक्षम, उद्योगप्रधान आणि नारीशक्तीला केंद्रस्थानी ठेवणारा राष्ट्र म्हणून जगभरात ओळखला जात आहे.



'राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती' हा विशेष अंक म्हणजे देशाच्या परिवर्तनाचा इतिहास असून, गेल्या एका दशकात सामान्य नागरिकांच्या आयुष्यात झालेल्या बदलाचे दस्तावेजीकरण त्यामध्ये करण्यात आले आहे, असे चव्हाण म्हणाले. शेतकरी, कामगार, गरीब, वंचित आणि उपेक्षित घटकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी व्यवस्था मोदी सरकारने निर्माण केली असल्याचे त्यांनी नमूद केले.

पारदर्शक शासनपद्धतीमुळे सरकारी योजनांचा लाभ थेट शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला. गरीबांच्या घरात उजेड, महिलांच्या आयुष्यात सन्मान, युवकांच्या हातात संधी आणि सामान्य नागरिकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला, असेही त्यांनी सांगितले.

या विशेष संग्राह्य अंकात 'अखंड भारत', 'अंत्योदय', 'सुरक्षित भारत', 'युवा भारत', 'मातृप्रधान भारत', विज्ञान, उद्योग आणि 'विकसित भारत २०४७' यांसारख्या विषयांवर विशेष लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच भारताने जागतिक स्तरावर निर्माण केलेला प्रभाव, सीमांवरील ठोस भूमिका आणि जागतिक संकटसमयी मानवतेसाठी धावून जाणारा संवेदनशील भारत यांचेही दस्तावेजीकरण या अंकात करण्यात आले आहे.

काही व्यक्ती अध्यात्मातून तपस्या करतात, काही कला आणि साहित्याद्वारे समाजासाठी कार्य करतात; मात्र मोदींनी स्वतःला राष्ट्रसेवेसाठी समर्पित केले आहे. म्हणूनच ते 'राष्ट्र तपस्वी' आहेत, असे गौरवोद्गार रविंद्र चव्हाण यांनी काढले.

मोदींच्या कार्याची माहिती जनतेपर्यंत संकलित स्वरूपात पोहोचावी, या उद्देशाने 'राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती' हा विशेष संग्राह्य अंक प्रकाशित करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

SPOT NEWS

## वारकरी संगीत भूषण पुरस्कारप्राप्त जगन्नाथ बोठे पाटील यांचे निधन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**



अहिल्यानगर तालुक्यातील वाळकी गावचे ज्येष्ठ नागरिक, प्रगतीशील शेतकरी व भागवत धर्माचे निष्ठावंत प्रसारक जगन्नाथ दगडुजी बोठे पाटील (वय ९०) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. जगन्नाथ बोठे पाटील यांचे पंचक्रोशीतील सामाजिक व धार्मिक कार्यात मोठे योगदान होते. ते स्वत: जुन्या काळातील संगीत विशारद हा संगीत क्षेत्रातील मानाची पदवी प्राप्त करणारे व्यक्तिमत्व होते. त्यांनी पंचक्रोशीतील हौशी तरुणांना टाळ, होर्मेनियम, तबला, पायपेटी व मृदंग वाजविण्यासह शास्त्रीय संगीत व भजनकला मोफत शिकविण्याची मोहीम पन्नास वर्षे राबविली. संगीत क्षेत्रातील या योगदानाबद्दल त्यांना सन २०१४ मध्ये पुण्यात शनिवारवाडा पटांगणात पार पडलेल्या नवव्या अखिल भारतीय वारकरी संगीत संमेलनात वारकरी संगीत भूषण या राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराने गौरविण्यात आले. आपल्या आयुष्यात शेती क्षेत्रात विविध प्रयोग करत एक प्रगतीशील शेतकरी म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला होता. शेतीसोबतच त्यांचा अध्यात्माकडे मोठा ओढा होता. भागवत धर्माचे पाईक म्हणून त्यांनी आयुष्यभर वारकरी संप्रदायाचा आणि भागवत धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी मोठे योगदान दिले. आपल्या साध्या, सरळ आणि मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी समाजात एक वेगळे आदरयुक्त स्थान निर्माण केले होते. वाळकी व परिसरात ते जगन्नाथतात्या या नावाने परिचित होते. राजकारणापासून ते नेहमीच जाणीवपूर्वक अलिप्त राहिले. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते वरिष्ठ पत्रकार ॲड. डॉ. बाळासाहेब बोठे पाटील, वाळकी येथील यशदीप गॅस एजन्सीचे संचालक प्रा. अनुपम बोठे पाटील आणि वीरपत्नी इंद्रायणी भालसिंग यांचे वडील होत.

## इंदुबाई बोडखे यांचे निधन

**● शेवगाव । वीरभूमी–**



तालुक्यातील खरडगाव येथील इंदुबाई लक्ष्मण बोडखे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या खरडगाव विकास सोसायटीचे सदस्य भाऊसाहेब बोडखे व रावसाहेब बोडखे, विठ्ठल बोडखे, कुसुम काकासाहेब लबडे यांच्या मातोश्री तर प्राथमिक शिक्षक तात्यासाहेब बोडखे यांच्या चुलती होत.

## शिलालेखांच्या डिजिटायझेशनसाठी 'ज्ञान भारतम्' उपक्रमात सहभागी व्हा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

ज्ञान भारतम, संस्कृती मंत्रालयामार्फत भारतीय ज्ञान परंपरेचा वारसा जतन करण्यासाठी जुन्या हस्तलिखिते, ग्रंथ, शिलालेख इत्यादींचे सर्वेक्षण, संवर्धन व डिजिटायझेशन करण्याबाबतचा प्रकल्प हाती घेतलेला आहे. जिल्ह्यातील नोंदणीकृत न्यासांनी त्यांच्याकडे जुनी हस्तलिखिते, ग्रंथ, शिलालेख असल्यास ती 'ज्ञान भारतम्' या मोबाईल ॲप्लिकेशनवर अपलोड करुन भारतीय ज्ञान परंपरेचा अमूल्य ठेवा जतन करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन धर्मादाय उपायुक्त, न. वा. जगताप यांनी केले आहे.

# मुलांचा प्रवेश झेडपी शाळेत घेणाऱ्या पालकांना वर्षभर घरपट्टी माफ

**पाथर्डी तालुक्यातील साकेगाव ग्रामपंचायतीचा ठराव । ग्रामीण शिक्षण व मराठी शाळा वाचवण्यासाठी ग्रामस्थ एकवटले**

**● पाथर्डी । वीरभूमी –**

जिल्हा परिषद मराठी शाळेचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी साकेगाव ग्रामसभेने एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. विशेष ग्रामसभेत, जे पालक आपल्या पाल्याचा प्रवेश जिल्हा परिषद शाळेत घेतील, त्यांना सन २०२६-२७ या वर्षाची घरपट्टी पूर्णपणे माफ करण्यात येईल, असा ऐतिहासिक ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. गावाने घेतलेल्या या अभिनव निर्णयाची सध्या संपूर्ण तालुक्यासह जिल्हाभरात जोरदार चर्चा सुरू असून पंचक्रोशीतून या उपक्रमाचे स्वागत होत आहे.

सध्याच्या काळात इंग्रजी माध्यमांच्या आकर्षणामुळे जिल्हा परिषद शाळांविषयी पालकांच्या मनात उदासीनता आणि अनेक गैरसमज निर्माण झाले आहेत. हे गैरसमज दूर करून सरकारी शाळांकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढवण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे



ग्रामसभेत सांगण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका एस. टेमकर यांनी पालकांना आश्वस्त करताना सांगितले की, विद्यार्थ्यांना खासगी शाळांच्या तोडीस तोड आणि उत्तम दर्जाचे शिक्षण दिले जाईल. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच संस्कारमूल्यांवरही विशेष भर दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच शाळेत उपलब्ध शैक्षणिक सुविधा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ याबाबतही त्यांनी ग्रामस्थांना सविस्तर माहिती दिली.

या ऐतिहासिक ग्रामसभेला सरपंच अलका चंद्रकांत सातपुते, उपसरपंच सुवर्णा संजय तांबे, ग्रामसेवक जे. अडसरे आणि मुख्याध्यापिका एस. टेमकर उपस्थित होत्या. तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक ॲड. चंद्रकांत सातपुते, रामदास सातपुते, डॉ. जालिंदर सातपुते, संतोष सातपुते, रामकिसन सातपुते, विष्णू सातपुते, साहेबराव सातपुते, चंद्रकांत देवढे, सुधाकर बळीद, शाहू बळीद, बाबासाहेब घुगरे, आश्रू सातपुते यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरपंच अलका सातपुते म्हणाल्या, गावातील जिल्हा परिषद शाळा ही केवळ एक इमारत नसून साकेगावच्या संस्कृतीचा आणि वैभवाचा पाया आहे. इंग्रजीच्या अवाजवी आकर्षणामुळे आपल्या मराठी शाळा ओस पडत चालल्या आहेत. हे चित्र बदलण्यासाठीच आम्ही घरपट्टी माफीचा हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. पालकांनी पैशांच्या मागे न धावता जिल्हा परिषद शाळेवर विश्वास ठेवावा. येथे विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळेल, याची ग्वाही ग्रामपंचायत आणि शाळा प्रशासनाच्या वतीने देत आहोत.

त्या पुढे म्हणाल्या, ग्रामीण भागातील मराठी शाळांचे अस्तित्व टिकवण्यासाठी आणि गरिबातील गरीब विद्यार्थ्यालाही स्थानिक पातळीवर दर्जेदार शिक्षण मिळावे, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. हा केवळ निर्णय नसून एक सामाजिक चळवळ आहे. यात संपूर्ण गावाने सहभागी व्हावे.

## अकोले-देवठाण रोडवर भीषण अपघात; युवकाचा जागीच मृत्यू

**● अकोले । वीरभूमी–**

अकोले-देवठाण रोडवरील सुगाव खुर्द हद्दीत रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाला चारचाकी वाहनाची जोरदार धडक बसून झालेल्या भीषण अपघातात एका युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी पहाटे घडली. दिगंबर शरद भांगरे (रा. नायगाव, ता. सिन्नर) असे मृत्यू झालेल्या युवकाचे नाव आहे.

अकोले पोलिसांकडून आणि स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिगंबर भांगरे हे त्यांच्या 'जितो' या चारचाकी वाहनातून एक मोटारसायकल घेऊन अकोल्याकडे येत होते. सोमवारी पहाटे सुमारे सव्वा एक वाजण्याच्या दरम्यान देवठाण रोडवरील सुगाव खुर्द परिसरात त्यांच्या वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जोरात आदळले.

या भीषण धडकेत दिगंबर भांगरे यांचा जागीच मृत्यू झाला.



प्राथमिक माहितीनुसार, वाहन चालविताना डोळ्यावर झोपेची झापड आल्यामुळे हा अपघात झाला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

मृत दिगंबर भांगरे हे अकोले शहरातील माळीझाप येथील बाळासाहेब मंडलिक यांचे भाचे होते. त्यांच्या अकाली निधनामुळे अकोले व सिन्नर तालुक्यात शोककळा पसरली आहे.

घटनेची माहिती मिळताच अकोले पोलिसांनी सोमवारी सकाळी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. पुढील तपास पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## संजीवनी पॉलिटेक्निकच्या प्लेसमेंट पॅटर्नला पुन्हा यश

**सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील १७ विद्यार्थ्यांना नामांकित कंपनीत नोकरीची संधी**

**● कोपरगाव । वीरभूमी–**

संजीवनी के. बी. पी. पॉलिटेक्निकच्या प्रभावी प्लेसमेंट पॅटर्नला पुन्हा एकदा यश मिळाले असून, सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील १७ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड झाली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षणाच्या जोरावर संस्थेने विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्यात यश मिळविले आहे.



सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील या १७ विद्यार्थ्यांना 'काळोखे आरएमसी' या नामांकित कंपनीत चांगल्या वेतनावर नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. संस्थेच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ही निवड प्रक्रिया यशस्वी ठरली. या यशामुळे इतर विद्यार्थ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये रविंद्र हेम्बाडे, मनोज हुळुळे, अक्षय मडके, दर्शन शिंदे, साईरात शिंदे, शिवम कोकरे, प्रणव कवडे, समर्थ सोनवणे, प्रथमेश थोरात, ओम मढे, विशाल शिंदे, आयुष यादव, सौरभ बनकर, श्रावणी सोनजे, नम्रता रणशूर, सचिन घाडगे आणि वेदांत बनसोडे यांचा समावेश आहे.

याबाबत माहिती देताना प्राचार्य ए. आर. मिरीकर म्हणाले की, उत्तम शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना चांगली नोकरी मिळावी, हे प्रत्येक पालक आणि विद्यार्थ्यांचे स्वप्न असते. ते पूर्ण करण्यासाठी संजीवनी के. बी. पी. पॉलिटेक्निक सातत्याने प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वृद्धीसाठी उद्योगाभिमुख प्रशिक्षण, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास तसेच प्रभावी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट उपक्रम राबविले जातात. 'संजीवनी पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश म्हणजे हमखास नोकरी' हे समीकरण आता दृढ झाले आहे.

संस्थेचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे यांनी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. तसेच मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांच्या हस्ते निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राचार्य ए. आर. मिरीकर, हेड ऑफ अकॅडमिक गव्हर्नन्स डॉ. आर. एस. शेंडगे तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाची टीम उपस्थित होती.

# अकोलेतील काजवा महोत्सवासाठी पर्यटकांवर वनविभागाकडून मर्यादा

**भंडारदरा-हरिश्चंद्रगड अभयारण्यात दररोज फक्त दोन हजार पर्यटकांना प्रवेश । वन विभागाची कडक नियमावली लागू**

**● अकोले । वीरभूमी–**

भंडारदरा-हरिश्चंद्रगड अभयारण्य क्षेत्रात काजवा महोत्सवादरम्यान वाढणारी गर्दी आणि पर्यावरणीय उपद्रव टाळण्यासाठी वन विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, आता दररोज केवळ दोन हजार पर्यटकांनाच काजवे पाहण्यासाठी प्रवेश दिला जाणार आहे. यासाठी वन विभागाकडून नवीन मोबाईल ॲप्लिकेशन विकसित करण्यात येत असून, पर्यटकांना पूर्वनोंदणी करणे बंधनकारक राहणार आहे.

मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून जूनच्या मध्यापर्यंत, मोठ्या पावसाच्या सरी सुरू होईपर्यंत, या अभयारण्यात काजवा महोत्सव आयोजित केला जातो. निसर्गाची अद्भुत अनुभूती घेण्यासाठी राज्यभरातून मोठ्या प्रमाणात पर्यटक येथे दाखल होत असतात.

पर्यटकांची वाढती गर्दी लक्षात घेता आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी वन्यजीव विभाग, नाशिकचे सहायक वनसंरक्षक अनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागाने विशेष नियमावली लागू केली आहे.

या नियमांनुसार, अभयारण्यात प्रवेश करताना पर्यटकांनी तपासणी नाक्यावर ओळखपत्र सादर करणे बंधनकारक राहील. रात्री ९ नंतर अभयारण्यात प्रवेश दिला जाणार नाही. तसेच पर्यटन शुल्काची पावती घेणे आवश्यक असेल.

काजवा निरीक्षणासाठी येणाऱ्या आणि मुक्काम न करणाऱ्या पर्यटकांनी रात्री १० वाजण्यापूर्वी अभयारण्य क्षेत्रातून बाहेर पडणे आवश्यक आहे. रात्री १२ नंतर अभयारण्यात फिरताना आढळणाऱ्या पर्यटकांवर प्रत्येकी ५०० रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे.



वन विभागाने अभयारण्यात पाळीव प्राणी आणण्यासही बंदी घातली आहे. कुत्रे किंवा मांजरी सोबत आणल्यास ५०० रुपयांचा दंड आकारला जाईल.

काजव्यांचे निरीक्षण करताना पर्यटकांनी वाहने नियोजित पार्किंगमध्येच उभी करावीत. वाहनांची हेडलाईट्स आणि मोबाईल फ्लॅश तत्काळ बंद ठेवावेत. रस्त्यावर वाहने उभी करून काजवे पाहण्यासाठी गेल्यास दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

अभयारण्य क्षेत्रात धूम्रपान, मद्यपान, गैरवर्तन तसेच वन्यप्राण्यांना इजा होईल अशी कोणतीही कृती करण्यास मनाई करण्यात आली आहे. आगपेटी, लाईटर यांसारखे ज्वालाग्राही पदार्थ, ध्वनीक्षेपक किंवा वाद्ये आणण्यास बंदी असून प्लास्टिक वापरावर पूर्णतः निर्बंध घालण्यात आले आहेत. वाहन चालवताना डिप्पर लाईटचा वापर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश गावित आणि प्रतिभा सोनवणे यांनी सांगितले की, पर्यटकांनी काजव्यांचे निरीक्षण करण्यासाठी जंगलात आतपर्यंत जाऊ नये. वन्यप्राण्यांकडून हल्ला झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित पर्यटकांची राहील. वन विभाग कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाही. काजवा महोत्सवाचा निसर्गस्नेही पद्धतीने आनंद घ्यावा आणि वन विभागाच्या नियमांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन भंडारदरा कळसुबाई अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश गावित आणि राजूर हरिश्चंद्रगड वनपरिक्षेत्र अधिकारी प्रतिभा सोनवणे यांनी केले आहे.

### वीकेंडला पर्यटकांची मोठी गर्दी

■ काजवा महोत्सवासाठी वीकेंडच्या काळात मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होत आहे. अहिल्यानगरसह नाशिक, पुणे, ठाणे, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर येथून पर्यटक मोठ्या संख्येने येत आहेत. शनिवारी सायंकाळपासूनच भंडारदरा येथील तपासणी नाक्याजवळ वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# विठ्ठल खर्चन मृत्यू प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात आंबेडकरी संघटनांचा ठिय्या

## दोषींवर गुन्हे दाखल होईपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याची नातेवाईकांची भूमिका

**पाथर्डी । वीरभूमी-** पाथर्डी पोलीस ठाण्यातील कथित पोलिसी हलगर्जीपणामुळे मृत्यू झालेल्या तरुण विठ्ठल खर्चन प्रकरणाने सोमवारी तीव्र वळण घेतले. या घटनेच्या निषेधार्थ तालुक्यातील विविध आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने एकत्र येत पाथर्डी पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन सुरू केले.

सकाळी सर्वप्रथम आंदोलकांनी उपजिल्हा रुग्णालयात ठाण मांडून पोलीस प्रशासनाशी चर्चा केली. त्यानंतर कार्यकर्त्यांनी मोर्चा पाथर्डी पोलीस ठाण्याकडे वळवला. पोलीस ठाण्याच्या आवारातच ठिय्या आंदोलन करत, संबंधित दोषींवर कठोर कारवाई होत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही तसेच मृतदेहावर अंत्यसंस्कारही करणार नाही, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली.

आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे प्रा. किसन चव्हाण, श्रीकांत बोर्डे, प्यारेलाल शेख, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष बाबा राजगुरू, अंबादास आरोळे, महेश अंगारखे, दलित महासंघाचे वसंतराव बोर्डे, अरविंद सोनटक्के आदींसह विविध संघटनांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यावेळी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, विभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक कलबुर्मे यांनी आंदोलकांशी चर्चा केली. मात्र, सायंकाळपर्यंत कोणताही तोडगा निघू शकला नाही.

पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांना तात्काळ हटवावे आणि संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करावी, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी लावून धरली. दरम्यान, मयत विठ्ठल खर्चन यांचे शवविच्छेदनासाठी दुपारी नगर येथे पाठविण्यात आले.

दिवसभर पोलीस ठाणे परिसरात तणावपूर्ण शांतता होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्यामुळे पोलीस ठाण्याला पोलीस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते.

सायंकाळपर्यंत आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम होते. मृत्यूस कारणीभूत असलेल्या संबंधितांवर गुन्हे दाखल झाल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका नातेवाईकांनी स्पष्ट केली.

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी खासदार प्रकाश आंबेडकर आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दूरध्वनीद्वारे आंदोलकांशी संपर्क साधला. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्याशी संवाद साधत योग्य कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.



या घटनेच्या निषेधार्थ बुधवारी सकाळी पाथर्डी शहरातील नाईक चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आंदोलकांनी दिली.

# जुन्या बसस्थानक परिसरातील टपऱ्यांना भीषण आग

**पाथर्डी । वीरभूमी-** शहरातील जुन्या बसस्थानक परिसरातील मोकळ्या जागेत उभ्या करून ठेवलेल्या काही टपऱ्यांना सोमवारी सकाळी साडेसातच्या सुमारास अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या आगीत ३ ते ४ टपऱ्या जळून खाक झाल्या. स्थानिक तरुणांनी प्रसंगावधान राखून आग विझवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे मोठा अनर्थ टळला.



अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर काही अतिक्रमणधारकांनी हटवलेल्या टपऱ्या जुन्या बसस्थानक परिसरातील मोकळ्या जागेत आणून ठेवल्या होत्या. सोमवारी सकाळी जुन्या बसस्थानकातून शेवगाव रोडकडे जाणाऱ्या मार्गालगत असलेल्या कचऱ्याला कोणीतरी आग लावल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. जोरदार वाऱ्यामुळे आगीने काही क्षणांतच उग्र रूप धारण केले आणि शेजारील टपऱ्यांनी पेट घेतला.

काही टपऱ्यांमध्ये लाकडी फर्निचर तसेच इतर साहित्य साठवून ठेवले असल्याने आगीची तीव्रता वाढली. पाहता पाहता टपऱ्या जळून खाक झाल्या. आगीच्या झळा शेजारील काही पक्क्या दुकानांपर्यंत पोहोचल्या होत्या. सुदैवाने सकाळच्या वेळी परिसरात नागरिकांची वर्दळ कमी असल्याने मोठी जीवितहानी टळली.

घटनेची माहिती मिळताच नगरसेवक देवा पवार, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर कोकाटे तसेच इतर स्थानिक तरुण घटनास्थळी धावले. त्यांनी स्वतः आग विझवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. दरम्यान, पाथर्डी नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाशी संपर्क साधण्यात आला; मात्र तेथे एकही कर्मचारी वेळेवर उपस्थित नसल्याचे समोर आले.

२४ तास अत्यावश्यक सेवा असलेल्या अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांच्या या हलगर्जीपणामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात आला. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून फोन गेल्यानंतर कर्मचाऱ्यांची धावपळ सुरू झाली. त्यानंतर अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाले आणि आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

एसटीचे सफाई कर्मचारी अमोल दिनकर तसेच पालिकेचे सफाई कर्मचारी विकास दिनकर आणि अमोल पठारे यांनीही बचावकार्यात सहकार्य केले. स्थानिक नागरिक आणि तरुणांच्या तत्परतेमुळे शेजारील दुकाने वाचली आणि मोठा अनर्थ टळल्याची भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली.

# राम कृष्ण हरी हाच मंत्र मानवजातीचा उद्धार करेल

## महंत विश्वनाथ गिरीजी महाराज । रामवाडी येथे गाथा पारायण व कीर्तन महोत्सव

**कोपरगाव । वीरभूमी-** संत ज्ञानेश्वर महाराजांना योग्यांची परंपरा लाभली असली तरी त्यांनी सर्वसामान्य जीवांचा उद्धार व्हावा म्हणून राम कृष्ण हरी हा साधा आणि सरळ मंत्र दिला. सद्गुरु योगीराज गंगागिरी महाराज आणि ब्रह्मनिष्ठ नारायणगिरीजी महाराज यांनीही हीच भक्तीपरंपरा पुढे चालवली आहे, असे प्रतिपादन महंत विश्वनाथ गिरीजी महाराज यांनी केले.



तालुक्यातील रामवाडी येथे आयोजित संत तुकाराम महाराज गाथा पारायण व कीर्तन महोत्सवाच्या पंचम पुष्पावेळी ते बोलत होते.

यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या योगिया दुर्लभ तो म्यां देखिला साजणी या अभंगाचे सखोल निरूपण करत भक्तीमार्गाचे महत्त्व विशद केले. योग, तपश्चर्या आणि कठोर साधनेने ज्याची प्राप्ती कठीण मानली जाते, तो परमेश्वर शुद्ध भक्ती आणि नामस्मरणामुळे सहज प्राप्त होतो, असे त्यांनी सांगितले.

महंत विश्वनाथ गिरीजी महाराज म्हणाले की, संतांनी आपल्या अभंगातून परमेश्वराच्या अनुभूतीचे अत्यंत प्रभावी वर्णन केले आहे. पाहातां पाहातां मना नपुरे धणी या ओळींतून ईश्वरदर्शनाचा आनंद अमर्याद असल्याचे स्पष्ट होते. परमेश्वराचे स्वरूप जितके अनुभवावे तितके कमीच वाटते. ईश्वरप्रेमात मन रमले की संसारातील दुःख, चिंता आणि मोह यांचा प्रभाव कमी होऊ लागतो.

फिटला संदेहो निमाले दुजेपण या अभंगातील ओळींचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, परमेश्वराचे खरे दर्शन झाल्यानंतर मनातील सर्व शंका आणि संभ्रम दूर होतात. भक्ती माणसाला द्वैतातून अद्वैताकडे घेऊन जाते. प्रत्येक जीवामध्ये परमेश्वराचे अस्तित्व पाहण्याची दृष्टी निर्माण झाल्यास समाजात प्रेम, बंधुभाव आणि मानवता वृद्धिंगत होईल, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी संगीत अलंकार अरुण पगारे, संदीप वैद्य, हभप. भाकरे महाराज, कृष्णा लकारे, विनायक महाराज, सुनील महाराज, धोंडीराम तपकीरे, वाल्मीक महाराज, पावडे महाराज यांनी संगीत साथ केली.

कार्यक्रमास रामायणाचार्य परशुराम अनार्थे, भागवत कथाकार सुरेखाताई टेके, सरपंच विवेक परजणे, शिवाजी महाराज ठाकरे यांच्यासह पंचक्रोशीतील वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कान्हेगाव, भोजडे, संवत्सर, लोकी, कोकणठाण, धोत्रे आदी गावांतील भाविकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रामवाडी येथील तरुण मित्र मंडळ व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

# हिंदू मेहतर-वाल्मिकी समाजासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करा

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना वाणे यांचे निवेदन । ‘समाजाच्या आर्थिक-सामाजिक उन्नतीसाठी स्वतंत्र विकास महामंडळाची गरज

**अहिल्यानगर । वीरभूमी-** हिंदू मेहतर/वाल्मिकी समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी स्वतंत्र महर्षी वाल्मिकी मेहतर आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी मागणी भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष किशोर वाणे व ड. कुणाल वाणे यांनी पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे. या संदर्भात राज्य सरकारकडे विशेष पाठपुरावा करण्याची विनंतीही त्यांनी केली.

शिर्डी येथे आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानादरम्यान किशोर वाणे यांनी पालकमंत्री विखे पाटील यांची भेट घेत निवेदन दिले. यावेळी भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, भाजप जिल्हा सरचिटणीस निखिल वारे, अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष संजय गायकवाड, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, ड. देवेंद्र बंब, भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा सरचिटणीस सुनिल सकट, अंशुमन वाणे आदी उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, हिंदू मेहतर/वाल्मिकी समाजाने गेल्या अनेक शतकांपासून हिंदू धर्माची परंपरा जपत साफसफाईचे काम प्रामाणिकपणे केले आहे. मात्र या समाजाला दीर्घकाळ सामाजिक उपेक्षा, आर्थिक अडचणी आणि शैक्षणिक मागासलेपणाचा सामना करावा लागला आहे. आजही समाजातील मोठा वर्ग बेरोजगारी, आर्थिक अस्थिरता आणि मूलभूत सुविधांच्या अभावाशी झुंज देत असल्याचे वाणे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रात हिंदू मेहतर/वाल्मिकी समाजाची लोकसंख्या २५ लाखांपेक्षा अधिक असून समाजातील युवक, महिला, छोटे व्यावसायिक आणि बेरोजगारांना विशेष आर्थिक मदत, स्वयंरोजगाराच्या संधी आणि कौशल्य प्रशिक्षणाची अत्यंत गरज आहे. सध्या विविध शासकीय योजनांचा लाभ समाजापर्यंत अत्यल्प प्रमाणात पोहोचत असल्याने स्वतंत्र आर्थिक महामंडळ स्थापन करणे काळाची गरज असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यात विविध समाजांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळे कार्यरत आहेत. त्यामध्ये शबरी आदिवासी वित्त विकास महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, परशुराम आर्थिक विकास महामंडळ आदींचा उल्लेख करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर हिंदू मेहतर/वाल्मिकी समाजासाठीही स्वतंत्र महर्षी वाल्मिकी मेहतर



आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.